# "पॅट"ची अनुभवसिध्द प्रभावी आयुर्वेदिक औषधे

- **आपोगॅब टॅब्लेट्स:** - आमांश,पोटांत गॅसेस व बध्दकोष्ठ.
- **कॅल्सिपॅट - एफ टॅब्लेट्स:** - रक्तांतील लोहतत्व वाढविते व हाडाना बळकटी देते.
- **फ्लूमल टॅब्लेट्स:** - मलेरिया व फ्लू च्या तापामध्ये उपयोगी.
- **हेमोपॅट टॅब्लेट्स:** - रक्त शुध्द करते व रक्तातील लोहाचे प्रमाण वाढविते.
- **लॅक्सोपॅट (स्ट्राँग) टॅब्लेट्स:** - जुनाट व तीव्र बध्दकोष्ठामध्ये अत्यंत प्रभावी.
- **मधुपॅट (रेग्युलर) टॅब्लेट्स:** - सौम्य मधुमेहामध्ये (प्रमेह) उपयोगी.
- **मेदोपॅट टॅब्लेट्स:** - मेदोरोग व स्थौल्यामध्ये उपयोगी.
- **मायोपॅट टॅब्लेट्स:** - ह्रदयविकारामध्ये उपयोगी.
- **मस्फ्रोज टॅब्लेट्स:** - आमवात,सांधेदुखी यांवर उपयोगी .
- **नर्व्होपॅट टॅब्लेट्स:** - बुध्दिमत्ता,स्मरणशक्ती व मानसिक सहनशक्ति यांचा दर्जा राखण्यासाठी.
- **सेप्टीपॅट-२५० टॅब्लेट्स:** - प्राथमिक जंतु संसर्गामध्ये उपयोगी.
- **सितोपॅट- एस् टॅब्लेट्स:** - तीव्र व जुनाट खोकल्यासाठी,ब्रॉंकायटीस मध्ये उपयोगी.
- **लॅक्टोपॅट टॅब्लेट्स:** - बाळंतपणामध्ये स्तन्यवर्धक व दुग्धवर्धक
- **पायरोपॅट टॅब्लेट्स:** - अंगातील कडकी,बारीक ताप व शरिरांत मुरलेला ताप यांवर उपयोगी
- **पॅट कफ टॅब्लेट्स:** - सर्दी, घशाची खवखव,खोकल्याची उबळ - ढास यामध्ये उपयोगी, गायक,वक्ते,शिक्षक व फिरते विक्रेते यांना उपयोगी.
- **युरोपॅट टॅब्लेट्स:** - मूत्रदाह,मूतखडा (मूत्राश्मरी) यामध्ये उपयोगी.

इ. स. १९७९ पासून आयुर्वेदाच्या सेवेत!

PAT

## पॅट फार्मास्युटिकल्स प्रा.लि.

यशोमंगल,जुन्या पोस्टाजवळ, डॉ.पटवर्धन रोड,
पनवेल (जि.रायगड)४१०२०६.
ग्राहक संपर्क क्रमांक:- ०२२ - २७४५६०३९

E mail : patpharmapvtltd@gmail.com **Website : www.patpharma.in**

(फक्त आयुर्वेदिक / मेडीकल स्टोअर्स / वैद्यकीय व्यावसायिकांसाठी प्रकाशित)

PAT

# युरोपॅट टॅब्लेट्स



मूत्रमार्गातील विविध जंतुसंसर्गामुळे होणारा मूत्रदाह - लघवीची आग कमी करते.



मूत्रल असल्यामुळे मूतखडयाचा (अश्मरी) मूत्रावाटे निस्सारण (निचरा ) करण्यास मदत करते.



निरंतर निरामय आरोग्याचा महामंत्र :-
संतुलन व संवर्धन करा
रोगप्रतिकारशक्ती, सौंदर्य, बुध्दी, मनसंतुलन व शक्ती ।
"पॅट"ची औषधे देतील निरंतर निरामय आरोग्याची प्राप्ती ।।

||श्रीगणेशाय नमः||    ||श्रीधन्वन्तरये नमः||    ||श्रीकरंजेश्वरी नमः||    ||श्रीव्याडेश्वराय नमः||

# युरोपॅट टॅब्लेट्स

➢ **घटकद्रव्ये:** पाषाणभेद, गोखरु, वरूण, अनंतमूळ, पुनर्नवा, चंदन, वाळा, गुळवेल.

| अ.क्र. | घटकाचे नांव | रस | वीर्य | विपाक | गुण प्रभाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | वायवर्ण छाल | तिक्त, कषाय | उष्ण | कटु | लघु, रुक्ष, अश्मरी भेदन |
| २ | पाषाणभेद | कषाय,तिक्त | शीत | कटु | लघु, स्निग्ध |
| ३ | गोखरु | मधुर | शीत | मधुर | गुरु, स्निग्ध |
| ४ | पुनर्नवा | मधुर, तिक्त, कषाय | उष्ण | कटु | लघु, रूक्ष |
| ५ | अनंतमूळ | मधुर, तिक्त | शीत | मधुर | गुरु, स्निग्ध |
| ६ | गुळवेल | तिक्त, कषाय | उष्ण | मधुर | गुरु, स्निग्ध |
| ७ | चंदन | तिक्त,मधुर | शीत | कटु | लघु, रूक्ष |
| ८ | वाळा | तिक्त,मधुर | शीत | कटु | रूक्ष, लघु |

➢ **रोगाची सामाजिक स्थिती:** लघवी होताना जळजळणे, दुखणे, लघवी होईल असे वाटून सुद्धा लघवी न होणे ही सगळी मूत्रवह प्रणालीमधे झालेल्या जंतुसंसर्गाची लक्षणे आहेत. स्थानिक अस्वच्छता हे याचे एक महत्वाचे कारण आहे. स्त्रियांमधे मूत्रवहन करणाऱ्या नलिकेची लांबी पुरुषांपेक्षा कमी असल्याने जंतुसंसर्गाची शक्यता पुरुषांपेक्षा जास्त असते. मूत्रपिंडांचा एक गंभीर आजार म्हणजे जिवाणूजन्य जंतुसंसर्ग होय. बहुतेक वेळा मूत्राशय व मूत्रनलिकांमधून जिवाणू मूत्रपिंडात प्रवेश करतात. अपघात झाल्यावरही इतर अवयवांना झालेल्या इजेमुळे मूत्रपिंडाला त्रास होऊ शकतो. अनेक औषधीरेणूदेखील मूत्रपिंडाला अपायकारक असतात. गार हवेत जास्त फिरल्याने, अतीमद्यपान, चहा-कॉफी च्या अती सेवनाने मूत्रनिर्मीती अधिक होते व किडनीवर ताण येतो किडनीस्टोन च्या रुग्णामधे मूत्राशयात झालेल्या खडयामुळे कधीकधी शरीराच्या आतल्या भागात जखम होऊन लघवी लालसर होण्याची शक्यता असते. त्यामुळेसुद्धा जंतुसंसर्ग होऊ शकतो. जास्त तिखट, तेलकट पदार्थ खाल्ल्याने, शारिरीक उष्मा वाढल्याने लघवीला जळजळ झाल्याचे पाहायला मिळते. केवळ मूत्रनिर्मिती हे एकच काम मूत्रपिंड करत असते असे नाही; पोटॅशियम, सोडियम क्लोराईड इत्यादी अणू-रेणूची पातळी व्यवस्थित राखण्याचे काम मूत्रपिंडे करतात. या अणू-रेणूच्या पातळीत थोडा जरी चढ उतार झाला तरी जीवनाला धोका निर्माण होऊ शकतो.त्याचप्रमाणे शरीरात किती प्रमाणात पाणी साचावे हे मूत्रपिंडाच्या कार्यावरून ठरते. अधिक प्रमाणात पाणी साचले तर पेशींमधे पाणी वाढून शरीरावर सूज येण्याचा धोका संभवतो . रक्त गाळून शुद्ध करण्याचे कामही मूत्रपिंड करतात. साधारणतः दर तासाला शरीरातील सर्व रक्त दोन वेळा गाळले जाते व त्यातील काही घटक शोषले जातात. हे शोषले जाणारे घटक कमी जास्त प्रमाणात शोषले गेल्यास शरीरावर लगेच त्याचा परिणाम दिसून येतो. उदाहरणार्थ

**रोगाची माहिती:** ळी कमी झाल्यास विविध तक्रारी जाणवू लागतात. डोके दुखणे, वैचारिक गोंधळ होणे, भूक न लागणे, मळमळ, उलटया होणे इतकेच नव्हे तर बेशुद्ध होणे अथवा फिट्स येणे इथपर्यंत त्रास होऊ शकतात.

➢ ओलसर, दमट जागेवर जंतूची वाढ लगेच होते. म्हणूनच स्थानिक अस्वच्छता किंवा लाल लघवी होणे, पोटात दुखून उलटी होईल असे वाटणे ही सगळी मूत्रनिर्मितीत झालेल्या बिघाडाची लक्षणे आहेत. मूत्रपिंडाचे आजार वाढल्यास मोठा धोका निर्माण होऊ शकतो. डायलिसीस करुन घेण्यापर्यंत परिस्थिती हाताबाहेर जाण्याआधीच योग्य उपचार घेणे श्रेयस्कर.

➢ **युरोपॅट टॅबलेटचे कार्य:** युरोपॅट टॅबलेटमधील गोखरु, वरूण, पुनर्नवा या औषधी द्रव्यांमुळे वृक्काचे (किडनी) कार्य अधिक चांगल्या स्तरावर होऊन लघवीचे प्रमाण वाढते व त्यामुळे जंतुसंसर्ग कमी होतो. पाषाणभेद नावाप्रमाणेच किडनीस्टोन च्या रुग्णामधे मूत्रवह प्रणालीमधे असलेला खडा बाहेर पाडण्यास मदत करते. चंदन, वाळा, अनंतमूळ ही द्रव्ये शीतगुणात्मक असल्यामुळे लघवीची जळजळ कमी करतात.

➢ **युरोपॅट टॅबलेट चा डोस व कोर्स:** १ ते २ गोळ्या जेवणानंतर कोमट पाण्यासह १ते ३ महिने घेणे. गरजेनुसार वैद्यकीय सल्ला घेणे.

➢ **आहार विहार व पथ्य:** आहारात तिखट व मसालेदार पदार्थांचे प्रमाण कमी असावे. वांगी, गवार, टोमॅटो, मटकी, चणे आहारात घेणे टाळावे. पाणी उकळून गार केलेले, नीट गाळलेले व भरपूर प्रमाणात प्यावे. आहारात काकडी, टरबूज - कलिंगड, केळी विपुल प्रमाणात ठेवावीत. मटण, चिकन आदी पदार्थांचे सेवन मर्यादित असावे.आहारात वरून कच्चे मीठ घेणे मूतखडयाच्या रुग्णांना त्रासदायक ठरू शकते. म्हणून मिठाचा वापर बेताचाच असावा.

➢ **पॅकिंग व उपलब्धी:** ५० टॅब्लेट्स.





